प्रेस नोट

दि.२८/०६/२०१९

## वेश्या व्यवसायातून परदेशातील मुलीची सुटका

दि.२८/०६/२०१९ रोजी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे पो.हवा.१७८१ दिनेश शिंदे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एजंट राजन हा वेगवेगळया हॉटेलमध्ये मुली ठेवून स्वतः तसेच त्याचे एजंट साथीदारांच्या साहाय्याने ग्राहकांना मुलींचे फोटो पाठवून वेश्या गमनसाठी रक्कम ठरवून, ग्राहकांना वेश्या गमनासाठी हॉटेलमध्ये पाठवितो अथवा ग्राहकांच्या मागणीनुसार संबंधित ठिकाणी पाठवतो. व तो वेश्या गमनाकरिता आलेल्या ग्राहकाकडून ५ हजार रू. नमूद मुली मार्फत अथवा त्याचे साथीदारांकडून पैसे स्वीकारतो. त्यातून स्वतःसाठी व साथीदार एजंटासाठी ठराविक हिस्सा काढून घेवून त्यावर स्वतःची व साथीदारांची उपजीविका भागवितो. तो कोरेगाव पार्क भागात ग्राहकांच्या मागणीनुसार वेगवेगळया ठिकाणी मुली पुरवितो व तो वेश्या व्यवसाय चालवितो, अशी बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मदन बहाद्दरपुरे, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे यांनी पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाफ व पंचासह हॉटेल मींट, रूम नं.२१४, साऊथ मेन रोड, लेन नं.१, कोरेगाव पार्क, पुणे येथे जावून छापा घातला असता, छाप्यामध्ये उझबेकिस्तान देशाची पीडित मुलगी मिळून आली. सदर मुलीकडून एजंट राजन हा वेश्या व्यवसाय चालवत असल्याचे समजले असून, सदर मुलीस पैशाचे आमिष दाखवून, पुण्यामध्ये आणून तिचेकरवी वेश्या व्यवसाय करून घेत आहेत, असे तपासात निष्पन्न झाल्याने, वर नमूद एजंटविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व नमूद पीडित परदेशी मुलीची वेश्या व्यवसायातून सुटका करण्यात आलेली आहे व तिस शासकीय महिला राज्यगृह, मुंढवा, पुणे येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर, मा.श्रीमती डॉ. प्रिती टिपरे, सहा.पोलीस आयुक्त सो., लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे, श्रीमती कल्याणी शिंदे, पोलीस उप निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे व पोलीस कर्मचारी हर्षदा शिंदे, रियाज शेख, सुनिल करंवदे, दशरथ सावंत यांनी केलेली आहे.